# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | ६ जुलै १९९२ | अंक ७ वा


# 'नीरो' चे वारस

**लेखक : शरद जोशी**

*"शेतकऱ्यांना शेतीमाल देशात किंवा देशाबाहेर विकण्याचे स्वातंत्र्य दिले तर त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांवर, निसर्गावर आणि एकूणच अन्नसंस्कृतीवर विपरीत परिणाम होईल."*

*"शेतीच्या कामातून निघून दुसऱ्या व्यवसायात जाणाऱ्या शेतकऱ्यांवर बंधने असली पाहिजेत."*

ही मते आणि विधाने कोणाची असावीत? एके काळी राव वीरेंद्रसिंग किंवा प्रा. दांतवाला यांसारखी मंडळी शेतकऱ्यांविरुद्ध असे गरळ खुले आम ओकीत असत. शेतकरी आंदोलन चालू झाल्यापासून असे लिहिण्याबोलण्याची फारशी हिम्मत सहसा कोणी करीत नसे. पण, पुन्हा असा विचार मांडणारे एक नवा मुखवटा घेऊन पुढे आहेत.

**लुटीची तत्त्वज्ञाने**

शेतीमध्ये होणाऱ्या गुणाकाराची लूट करणाऱ्यांनी इतिहासामध्ये वेगवेगळ्या कालखंडांत वेगवेगळ्या सबबी आणि तत्त्वज्ञाने सांगितली आहेत. धर्मप्रसाराकरिता म्हणून शेतकऱ्यांची लूट झाली, धर्मसंरक्षणाकरिता शेतकऱ्यांची लूट झाली, राष्ट्रसंरक्षणाच्या नावाने शेतकऱ्यांची लूट झाली आणि दुसऱ्या देशावर आक्रमण करून स्वराष्ट्राची शान वाढविण्याच्या घोषणेखालीही शेतकऱ्यांची लूट झाली. पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र साम्राज्य पसरविणाऱ्यांनी वसाहती तयार केल्या; त्यासाठीसुद्धा त्यांनी धर्मप्रसार आणि संस्कृतीप्रसार (White man's burden) यांची सबब सांगितली.

स्वातंत्र्यानंतर, गोऱ्या इंग्रजांच्या आमदनीतील गांधीजींचा आर्थिक दृष्टिकोन नेहरूंनी पायदळी तुडविला आणि शेतकऱ्यांच्या लुटीवर आधारित अशी औद्योगीकरणाची योजना आखली. या औद्योगीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा करण्यासाठी एक विचाराचा आणि तत्त्वज्ञानाचा डोलारा पंडित नेहरूंनी उभा केला. या डोलाऱ्याचे तीन खांब समाजवाद, नियोजन आणि शास्त्रविज्ञान.

**नेहरूवादाची त्रिसूत्री**

**★ समाजवाद**

पंडित नेहरू काही मोठे निष्ठावंत समाजवादी होते असे नाही. किंबहुना, काँग्रेसमधील समाजवादी गटाचा त्यानी नेहमी रागराग केला. पण, रशियातील क्रांतीनंतर तेथे समाजवादाचा जो प्रयोग झाला त्याची त्यांनी एकदा धावती पाहाणी केली तेव्हा त्या प्रयोगाच्या भव्यतेने ते दिपून गेले आणि त्यातील काव्याने ते मोहरून गेले. समाजवादाची भाषा नेहरूंनी वपरली ती एक आर्थिक-सामाजिक दर्शन म्हणून नव्हे. कामगार वर्गाचे आणि नेहरूंचे फार काही कळकळीचे संबंध होते असेही नाही. नेहरू हे सर्वार्थाने गुलाबी राजबिंड्या शहरवसियांचे प्रतिनिधी होते. समाजवादाचा उद्घोष करायचा, कामगारांच्या क्रांतीची भाषा वापरायची, पण प्रत्यक्षात, पांढरपेशांच्या आणि नोकरशहांच्या हाती सत्ता काबीज करायची या प्रवृत्तीचे ते अग्रेसर नेते होते. नेहरूंचा समाजवाद म्हणजे काव्य आणि नोकरशाही यांचे अजब मिश्रण होते.

**★ नियोजन**

नियोजनाची नेहरूप्रणित संकल्पना ही अशीच भद्र लोकांच्या सोयीसोयीची होती. नियोजन म्हणजे शेतकऱ्यांची लूट, कारखानदारीची बरकत. आणि हे सर्व चक्र चालविण्याची सर्वंकष सत्ता नोकरशहांच्या

हाती अशा तऱ्हेने की लायसेन्स - परमिट राज्यांत आपल्या मर्जीतल्या लाडक्या कारखानदारांच्या सोयीने सर्व चालावे. नेहरू-नियोजनाचा खरा अर्थ असा होता. निदान त्या नियोजनाचे पर्यवसान तरी भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि देशाची दिवाळखोरी यातच झाले.

**★ शास्त्रविज्ञान**

आद्योगीकरणावर भर देण्यासाठी नेहरूंनी शास्त्र आणि तंत्रज्ञानाचा खूप बोलबाला केला. आजही त्यांना इंडियातील आधुनिक युगाचे प्रणेते मानले जाते. शेती, विशेषतः पारंपरिक शेती म्हणजे सगळा जुनाट गबाळग्रंथी कारभार आहे, त्यातून बाहेर पडून शास्त्र आणि विज्ञान यांच्या आधाराने उद्योगधंदे तातडीने उभे राहिले पाहिजेत असे पंडितजी आग्रहाने मांडत असत.

**चैत्रगौरी औद्योगिकरण**

औद्योगीकरण झपाट्याने करण्याचा आग्रह अनेकांनी पूर्वीही धरला होता. जर्मन राष्ट्र बळकट करून जगावर प्रभुसत्ता मिळविण्यासाठी हिटलरने औद्योगीकरणाचा आग्रह धरला. समाजवादी उद्योगधंद्यांच्या विकासासाठी स्टॅलिनने शेतकऱ्यांवर रणगाडे घातले. पंडितजींनी राष्ट्र आणि समाजवाद यांच्या जोडीला शास्त्र-विज्ञानाची नवी सबब काढली. नेहरूप्रणीत समाजवाद आणि नियोजन यांचा खरा मतितार्थ जसा नेहरूंच्या रसिक काव्यात्मकतेत होता तसाच शास्त्र विज्ञानाचा आग्रहही काव्यात्मकच होता.

तिसऱ्या जगाचे नेते म्हणून राष्ट्रभर फिरावे. इतर देशांतील नेत्यांनाही भारतात आणावे. त्यांच्या देशातील प्रेक्षणीय स्थळांना आपण इतमामाने भेटी द्याव्या आणि परदेशी पाहुणे हिंदुस्थानात आले म्हणजे त्यांना दिपवण्यासारखी काही आधुनिक स्थाने आपल्याकडेही असावीत ही त्यांची खरी उर्मी होती. चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाच्या वेळी येणाऱ्या सुवासिनीवर छाप पाडण्यासाठी गृहिणी जशा इकडून तिकडून उधार उसनवारीने खेळणी, चित्रे आूणन गौर सजवतात तसा प्रकार नेहरू-नियोजनाचा होता, समाजवादाचा होता आणि विज्ञानप्रेमाचाही होता.

पन्नास वर्षांच्या औद्योगीकरणाच्या खटाटोपानंतर भारतासारख्या देशांची शास्त्रविज्ञानात अशी काही प्रगती झाली नाही. उलट, पन्नास वर्षांपूर्वी शास्त्रविज्ञानात सुधारित जगाच्या तुलनेने ते जितके मागासलेले होते त्यापेक्षा आज अधिक मागास पडले आहेत.

**'नीरो'ची प्रतिभा**

नेहरूंच्या रसिकतेपोटी देशाची फाळणी झाली. आणि या रसिकतेपोटीच देश दिवाळखोर झाला. एवढेच नव्हे तर कोट्यावधी संसार बेचिराख झाले. रोम साम्राज्याचा बादशाह नीरो याने आपल्या प्रतिभाविलासाकरिता साऱ्या शहराला आग लावली व ते भव्य भयाण दृश्य पाहात तो आपले तंतुवाद्य वाजवीत होता असे म्हणतात. इतिहासाची साक्ष आहे की नेहरू भारताचे नीरो होते.

समाजवादाचा आता वैश्विक पराभव झाला आहे. नियोजन ही संकल्पनाच अव्यवहार्य आहे असे या व्यवस्थेचे गंभीरपणे प्रयोग केलेले देशही मानू लागले आहेत. खुली बाजारपेठ ही काही आदर्श व्यवस्था आहे असे नाही, पण खुल्या बाजारपेठेपेक्षा जास्त सोयीस्कर असा पर्याय नाही हे जगन्मान्य होऊ लागले आहे. तिसऱ्या जगातील नियोजनाचा बडेजाव मिरविणारे सगळे देश दिवाळे काढून हाती भिक्षापात्रे घेऊन उभे आहेत.

**नवे 'नीरो'**

खुल्या बाजारपेठेचा उद्‌घोष आता, ज्यांची सगळी हयात नेहरू-नियोजनाचा पुरस्कार करण्यात गेली असेही श्रेष्ठही करू लागले आहेत. लायसेन्स-परमिट राज्य संपविण्याच्या आरोळ्या चौफेर ऊठत आहेत. पण म्हणजे नेहरूवाद संपला आहे असे नाही. समाजवाद हटला, नियोजनाची भांडेफोड झाली आणि शास्त्रविज्ञानाच्या घोषणांतील उथळ भंपकपणा सिद्ध झाला. नेहरूवादाचे तीनही पाय तुटले तरी नेहरूवाद जिवंतच आहे. खरा नेहरूवाद म्हणजे येन केन प्रकारेण शहरी, आंग्लविद्याविभूषित भद्रलोकांचे कल्याण साधणे. नेहरूंनी हे कल्याण समाजवाद नियोजन, विज्ञान या त्रयीने करण्याचा उघद्‌व्याप केला. आता ही नाणी चालत नाहीत म्हणून "स्वातंत्र्य", "खुली बाजारपेठ" असल्या फसव्या घोषणा करत नवे शासन पुढे सरसावले आहे. नेहरूवादावर उघडपणे हल्ला करण्याची हिम्मत नरसिंहराव दाखवत नाहीत, मनमोहन सिंगही दाखवत नाही. यांत राजकीय सोय असेलही. पण नेहरूंचे अवडंबर संपविण्याची व्यापक मोहीम नव्या अर्थव्यवस्थेचे प्रणेते घेत नाहीत. कारण अखेरीस त्यांचे आणि नेहरू व्यवस्थेचे आंतरिक हेतू समानच आहेत. सगळे नवे स्वातंत्र्य आणि स्वच्छ हवा शहरांपुरतीच मर्यादित राहावी, कारखानदारांना तिचा लाभ व्हावा पण शेतकऱ्यांना मात्र या नवीन युगाचा संपर्क होऊ नये असे भरकस प्रयत्न चालू आहेत. हे प्रयत्न शासनाला फारसे परवडणारे नाहीत तरीही, जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही, शासन प्रयत्न करीत राहाणार आहे.

**दुटप्पी तत्वज्ञान**

पण नव्या अर्थव्यवस्थेचा उद्‌घोष

करणाऱ्यांच्या मार्गात एक मोठी अडचण आहे. खुल्या व्यवस्थेच्या नावाने कारखानदारांना सर्व सोयीसवलती द्यायच्या पण परदेशांतल्या महागड्याा गव्हाची मात्र भरपेट आयात करायची, कापूस कांद्यांवर निर्यातबंदी घालायची, शेतीमालाच्या प्रक्रियेवर आणि विक्रीवर बंधने लादायची अशा दुटप्पी वागणुकीचे समर्थन कसे करायचे? थोडक्यात, नेहरू - नियोजनांत इंडिया-भारत सावत्रपणा खपून गेला. खुल्या स्वतंत्र व्यवस्थेत अशा भेदाभेदाचे काय तत्वज्ञान सांगायचे? खुल्या बाजारपेठेच्या मुक्त व्यवस्थेत शेतकऱ्यांवर तेवढी गुलामी लादूनच ठेवायची हे दिसायला तरी विचित्र दिसेल; असल्या पक्षपातीपणाचे आणि शेतकरी दुष्टाव्याचे समर्थन तरी कसे करावे, त्याचे तत्त्वज्ञान कोणते मांडावे याची मोठी चिंता दुनियाभरच्या 'इंडिया'वाद्यांना पडली आहे!

शेतकऱ्यांवरच्या या जुलुमाचे समर्थन आणि तत्त्वज्ञान उभे करण्याचे काम एक नवाच कंपू करू पाहातो आहे. वेगवेगळ्या मिषाने आणि निमित्ताने शेतकऱ्यांविरुद्ध ही मंडळी गनीमी काव्याने लढण्यास सज्ज झाली आहे. या लेखाच्या सुरुवातीला दिलेली अवतरणे ही या मंडळींच्या लिखाणातून आणि वक्तव्यातूनच आलेली आहेत. आपल्याला शेतकऱ्यांचा मोठा कळवळा आला आहे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक भले करणे हाच आपला हेतू आहे, यासाठी शेतकऱ्यांचे पाश्चिमात्य देशांपासून संरक्षण केले पाहिजे, विशेषतः बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून केले पाहिजे असा कांगावा त्यांनी चालविला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि पाश्चिमात्य राष्ट्र यांच्यापासून शेतकरीबाळाचे संरक्षण करण्याचा एकमेव आणि उघड उपाय म्हणजे आंतरराष्ट्रीय आयात-निर्यात बंद करून या बागुलबुवास दरवाजाबाहेर ठेवावे, असा त्यांचा प्रचार चालू आहे.

**जेत्यांचे नवे 'अ'पुरुषावतार**

या नव्या कंपूतील बहुतेक मंडळी पाचदहा वर्षांआधी उघडउघड कम्युनिस्ट, डावी, प्रागतिक इत्यादी बिरुदावलींखाली मिरवत होती. एका बाजूस ग्राहक आणि दुसऱ्या बाजूस भूमिहीन अशा अडकित्त्यांत शेतकऱ्याला कातरण्याचे काम यांनी जिंदगीभर केले. शेतीमालाच्या लुटीचा जुना कार्यक्रम ते आता नव्या झेंड्याखाली मांडू लागले आहेत. शहरांतील आंग्लविद्याविभूषित भद्र समाजातील हे राजबिंडे नेहरूवादाचे वारसदास आहेत. खुली अर्थव्यवस्था आली तर शासन आणि शासकीय संस्थांना काही महत्त्व राहणार नाही; पर्यायाने, नोकरशाहीचे महत्त्व संपुष्टात येईल. गेल्या काही वर्षांत गब्रू झालेली कामगार मंडळींची आता गबाळ गळधट कामे करून टोलेजंग पगार, बोनस संघटित ताकदीवर मिळविण्याची सद्दी संपली तर, आणि धवलवसनी उच्च नोकरीदारांच्या हातातली सत्ता गेली तर काय होईल या चिंतेने हा कंपू व्याकूळ झाला आहे. भद्र लोकांच्या मिरासदारीचे समर्थन आतापर्यंत समाजवाद, नियोजन आणि शास्त्रविज्ञान अशा गोंडस, मोहक आणि भारावून टाकणाऱ्या शब्दांनी झाले. आता या तीनही संकल्पनांची भांडेफोड झाल्यानंतर नोकरशहांच्या हाती सत्ता चालू ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांची लूट पुढे नेण्यासाठी सबब काय सांगावी? या नव्या कंपूने पर्यावरणाचा बागुलबुवा उभा करून नेहरूधर्तीची व्यवस्था चालू ठेवण्याचा घाट घातला आहे.

भांडवलशाही व्यवस्थेपेक्षा समाजवादी व्यवस्था ही अधिक झपाट्याने आर्थिक प्रगतीकडे नेणारी आहे हे आता साफ खोटे ठरले आहे. भांडवलशाही व्यवस्थेत पुन्हापुन्हा अरिष्टे येतात, बेकारी माजते; समाजवादी व्यवस्थेत असल्या काही आपत्ती येत नाही असल्या वल्गना आता कुणी ऐकून घ्यायलासुद्धा तयार नाही. खुल्या बाजारपेठेपेक्षा 'ज्याच्या त्याच्याकडून त्यांच्या सामर्थ्याप्रमाणे आणि ज्याला त्याला त्याच्या गरजेप्रमाणे' ही प्रणाली तर आता निव्वळ हास्यास्पद ठरली आहे. मग कोणातरी मध्यवर्ती दुढ्ढाचार्याचा हस्तक्षेप असला पाहिजे हा आग्रह कोणत्या मिषाने धरावा? खुल्या बाजारपेठेतील सर्व त्रुटी लक्षात घेऊनसुद्धा ही सर्वांत कार्यक्षम व्यवस्था आहे हे आर्थिक पातळीवर तरी नाकारणे शक्य नाही म्हणून आता खुल्या बाजारपेठेवरचा एक जुनाच आक्षेप नव्या उत्साहाने ही पर्यावरणवादी मंडळी मांडीत आहेत. आर्थिक नियोजनाचे जे दूरगामी परिणाम होतात त्याकडे बाजारपेठ लक्ष देऊ शकत नाही. पर्यावरणाचा प्रश्न गंभीर आहे. बाजारपेठ पर्यावरणाच्या मोडतोडीची दाद घेऊ शकत नाही. तस्मात, यासाठी पर्यावरणासाठी नियोजन आवश्यक आहे. निर्यात, आयात व्यापार यांवर बंधने आवश्यक आहेत. येन केन प्रकारेण भद्र लोकांच्या हस्तक्षेपाची आवश्यकता सिद्ध करण्याचा पूर्वाश्रमीच्या प्रागतिकांचा हा नवा डाव आहे.

**'डंकेल' प्रस्ताव**

मध्यंतरीच्या काळात एका आंतरराष्ट्रीय संघटनेच्या डंकेल नावाच्या अधिकाऱ्याने आंतरराष्ट्रीय विचारविमर्शासाठी काही प्रस्ताव मांडले. त्यांतील शेतकऱ्यांसंबंधीचे प्रस्ताव थोडक्यात असे होते – अनेक देशांत (यांत अमेरिका, यूरोप, जपान, कोरिया, इस्रायल इत्यादींची प्रामुख्याने गणना होते.) शेतीमालाची निर्यात वाढविण्यासाठी आणि बाहेरून होणारी शेतीमालाची आयात

रोखण्यासाठी वेगवेगळे उपाय योजले जातात. त्यांत शेतकऱ्यांना वेगवेगळ्या मिषाने सूट-सबसिडी देणे किंवा बाहेरून येणाऱ्या मालांवर करांची आकारणी करणे इत्यादी मार्ग येतात. तिसऱ्या जगातील अविकसित देशांत शेतकऱ्यांचे असे कौतुक फारसे दिसत नाही; या उलट भारतातल्याप्रमाणे शेतकरीविरोधी अशी धोरणेच राबविण्यात येतात. डंकेलसाहेबांच्या प्रस्तावात एक वेळापत्रक सुचविण्यात आले आहे आणि त्या वेळापत्रकाप्रमाणे सूट-सबसिड्यांचे हे साम्राज्य आणि खुल्या बाजारपेठेतील शासकीय हस्तक्षेप संपवून टाकण्याकरिता एक वेळापत्रक दिले आहे. यात आक्षेपार्ह ते काय आहे? ही तर गेली दहा वर्षे शेतकरी संघटनेची मागणी राहिली आहे. भारतीतील शेतकऱ्यांना सूट-सबसिडी मिळतच नाही, काही भाग्यवंतांना जी मिळते ती नगण्य आहे. तेव्हा, डंकेलसाहेबांच्या प्रस्तावामुळे भारतीय शेतकऱ्यास काहीच तोशीस पडणार नाही. उलट, हे प्रस्ताव प्रत्यक्षात अंमलात आले तर भारतीय शेतकऱ्यांचे भले होईल, त्यांना निर्यात करणे सुलभ होईल आणि भारतात शेतीमालाची आयात करणे अधिकच महागाडे होईल. अशी परिस्थिती असतांनाही पर्यावरणवादी डंकेलप्रस्तावावर तुटून पडले आहेत; शेतकऱ्यांना आता सूट-सबसिडी मिळणार नाही याबद्दल दुःखाचे उमाळे फुटल्याचे ते दाखवीत आहेत. भारतीय शेतकऱ्यांना आजपर्यंत अशी काही शासनाची मदत झाली नाही याचे त्यांना भान नव्हते ते आजच एकदम त्यांना आले आहे.

आंतराष्ट्रीय खुली बाजारपेठ झाली तर बहुराष्ट्रीय कंपन्या हिंदुस्थानात शेतीमाल आणून ओततील अशी आवई पर्यावरणवादी ऊठवीत आहेत. अस्मानीचे आणि सुलतानीचे सर्व प्रहार सोसूनही भारतीय शेतकरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करण्यास आज सशक्त उभा आहे याची या शहरी पर्यावरणवाद्यांना काही जाणकारी नसावी. नेहरूव्यवस्थेखाली अफाट किंमती देऊन आयात केलेला शेतीमाल देशातील बाजारपेठेत ओतून देशातील शेतीमालाचे भाव पाडण्यात आले याचे या पर्यावरणवाद्यांना काही दुःख झाल्याचे माहीत नव्हते. आता खुल्या बाजारपेठेला विरोध करण्याकरिता शेतकऱ्यांना संरक्षणाची आणि संगोपनाची आवश्यकता असल्याचा त्यांना साक्षात्कार झाला आहे!

डंकेलसाहेबांच्या प्रस्तावात आणखी एक सूचना आहे. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून शेतीतील ज्यादा श्रमशक्ती बिगरशेती व्यवसायांत जाण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी ती सूचना आहे. हा प्रस्तावही शेतकरी संघटनेच्या आजपर्यंतच्या मागण्यांशी सुसंगत आहे. किंबहुना, शेतीवर जगणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण जितके कमी तितका देशाचा विकास अधिक असे सूत्रही संघटनेने आग्रहाने मांडलेले आहे. नेहरूव्यवस्थेच्या गेल्या अर्धशतकात राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा ६६ टक्क्यांवरून २८ टक्क्यांवर आला, पण शेतीवर जगणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी मात्र ७० च्या आसपास कायम राहिली ही हकीकत नेहरूवादाच्या अपयशाचा निर्णायक पुरावा आहे असे संघटनेने मांडलेले आहे. शेतीवरील हा ७० टक्के लोसंख्येचा बोजा कमी करण्याची काही निश्चित योजना असली पाहिजे असे डंकेलसाहेबानी सुचविल्यावर पर्यावरणवाद्यांचा मोठा चडफडाट चालला आहे.

शेती आधुनिक बनली पाहिजे आणि ती विज्ञाननिष्ठ राहिली पाहिजे हा शेतकऱ्यांचा आग्रह आहे. हरितक्रांतीचे तंत्रज्ञान एका काळी मोठे उपयुक्त ठरले, त्यामुळे अत्यंत कठीण काळात उत्पादन वाढविता आले, लक्षावधींचे जीव त्यामुळे वाचले हे सगळे खरे असले तरी हरितक्रांती हितकारक नाही. त्यासाठी खऱ्याखुऱ्या विज्ञानाची कास धरून शेतीचे नवीन तंत्रज्ञान तयार करावे लागेल ही शेतकऱ्यांची खरीखुरी भूमिका आहे. जुन्या बियाण्यांचे वाण तर नष्ट होऊ द्यायचे नाहीत, पण आधुनिक शास्त्रांचा पुरेपूर वापर करून नवनवीन वाणे, बियाणे तसेच सुधारित पोषणतत्त्वे आणि औषधे तयार व्हायला पाहिजेत हेही तितकेच खरे. बहुराष्ट्रीय कंपन्या इत्यादींच्या बागुलबुवाच्या धाकाने शेतकऱ्यांना सदासर्वकाळ मागासलेल्या शेतीत ठेवता येईल हे शक्य नाही. शास्त्रविज्ञानाची डिमडिम वाजवणारी मंडळीच आता नवीन विज्ञानाच्या आधाराने बहुराष्ट्रीय कंपन्या तिसऱ्या जगावर स्वामित्व गाजवतील अशी हाकाटी करीत आहेत.

थोडक्यात, शेतकरी संघटनेची भूमिका आज डंकेल साहेबाने मांडली आहे आणि त्याला सर्व 'इंडिया' वादी आणि पर्यावरणवादी विरोध करीत आहेत.

**विचित्र जमात**

इंडियातील पर्यावरणवादी ही तशी मोठी विचित्र जमात आहे. भारतातील दारिद्र्याचे परिणाम म्हणून जे प्रदूषण होते याची त्यांना जाण नाही. पृथ्वीच्या पातळीवर औद्योगीकरणाच्या असमतोलामुळे पर्यावरणावर होणाऱ्या विपरीत परिणामांमुळे त्यांना दुःख होते, पण इंडिया-भारतातील औद्योगीकरणाच्या असमतोलामुळे तोच प्रकार त्यांच्या पायाखाली त्यांच्या देशातही घडतो आहे याचे त्यांना फारसे भान नाही. आंतरराष्ट्रीय परिसंवादांत, सभापरिषदांत सगळ्या अविकसित देशांतील सगळ्या

जनांचे हितसंबंध एकच आहेत, त्यांत काही 'इडिया-भारत' असा फरक नाही असे सोंग ते आणतात आणि एका बाजूला विकसित व दुसऱ्या बाजूला एकसंघ अविकसित देशांतील प्रजा पर्यावरणाच्या समरांगणावर समोरासमोर संघर्षाकरिता उभे ठाकले आहेत असे भासवतात. भारतातील पर्यावरणवाद्यांचे बहुतेक कंपू आता 'बेरोजगार' झालेल्या डाव्या कार्यकर्त्यांच्या छावण्या झाल्या आहेत.

**खरा पर्यावरणवाद**

पर्यावरणाचा प्रश्न गंभीर आहे, त्याकडे त्यांनी अवश्य लक्ष द्यावे. पर्यावरणाचे खरे संरक्षक आणि शेतकरी यांच्यात संघर्ष उभा राहूच शकत नाही. आज तो संघर्ष उभा राहिल्यासारखा दिसतो आहे याचे कारण या पर्यावरणवाद्यांमध्ये पर्यावरणनिष्ठा कमी आणि भद्र लोकांना पुन्हा एकदा सत्ता व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची जिद्द जास्त प्रबळ हे, आहे.

पर्यावरणाचा प्रश्न वेगवेगळ्या कारणांनी जास्त विक्राळ बनत चालला आहे. त्यांना तोड काढणे हे महत्त्वाचे आहे आणि तांतडीचेही आहे. या विषयावर चिंता आणि चिंतन करणाऱ्या सर्वांना एका गोष्टीची खात्री आहे. केन्द्रीकरणाने पर्यावरण सुधरत नाही विकेन्द्रीकरणाने सुधारते. न्यूयॉर्क, दिल्ली, मुंबई येथे यंत्रणा उभारून पर्यावरणाचा विनाशच करतील संरक्षण नाही.

औद्योगीकरणाचा अपरिहार्य परिणाम म्हणून काही प्रदूषणाच्या समस्या तयार होतात, त्यातल्या काही टाळता येण्यासारख्या असतात, काही नसतात. यासाठी स्थानिक पातळीवर बंधने परिणामकारक ठरू शकतील. त्यासाठी बोजड शासकीय इन्स्पेक्टरगिरीची गरज नाही. पृथ्वीवरील काही देशांत औद्योगीकरण जास्त झाले. तिसऱ्या जगातील देशांत औद्योगीकरणाची काही बेटेच उभी राहिली अणि तेथेच पाश्चिमात्य तोंडावळ्याचा प्रदूषणाचा प्रश्न उभा राहिला. शेतीतून तयार होणाऱ्या बचतीतून औद्योगिक भांडवल तयार होणे, त्यांतून छोट्या उद्योगधंद्यांपासून मोठ्या कारखान्यापर्यंतची वाढ हे सर्व शेतकऱ्यांच्या हातात राहिले असते, थोडक्यात, भांडवलनिर्मितीची प्रक्रिया शेतकऱ्याच्या शोषणावर आधारलेली नसती तर मुंबईसारखे कारखान्यांचे उकीरडे तयार झाले नसते आणि प्रदूषणाचा प्रश्न आटोक्यात राहिला असावा. साम्राज्यवादाने अधिक प्रदूषण फोफावले आणि नेहरूवादाने तिसऱ्या जगांतील औद्योगिक प्रदूषणाची मुहूर्तमेढ रोवली.

पर्यावरणाचा प्रश्न हा शेतीमालाच्या भावाच्या समस्येतून तयार झालेल्या आपत्तींपैकी एक आहे. काही प्रमाणात, तंत्रज्ञानातील त्रुटी आणि दोष यांमुळेही पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्या उभ्या राहिल्या आहेत. पण या बाबतीत कोणालाही, निर्दोष तंत्रज्ञान आपण उभे करू शकू अशी शेखी मिरवता येणार नाही. नवीन शोध लावला लावता चुका करीत आणि त्या सुधारीतच माणसाची प्रगती होऊ शकेल. अशीच परिस्थिती वेगवेगळ्या प्रकल्पांबद्दलही आहे. उदाहरणार्थ, नर्मदा प्रकल्पाचा पर्यावरणावर काही विपरीत परिणाम होईल हे उघड आहे. पण, नर्मदामातेचा जलौघ समुद्रात जाऊन पडत राहिला तर त्याचेही काही पर्यावरणी दुष्परिणाम आहेत हे डोळ्याआड करून चालणार नाही. राजस्थानच्या वाळवंटात पाणी न्यावे, तेथे हिरवळ करावी या योजनेला सर्व पर्यावरणवादी साहजिकच पाठिंबा देतील, पण वायव्येतील वाळवंटे संपली तर सर्व मान्सून व्यवस्था ढासळून जाईल अशी शास्त्रज्ञांना गंभीर चिंता आहे. खरीखुरी परिस्थिती काय आहे याविषयी कुणीच फार अहंकाराने बोलू शकणार नाही.

**नीरोची पिलावळ**

पर्यावरणवादी आणि पर्यावरणवाद यांची ही एकूण अशी नाजूक अवस्था आहे तरीही त्यांची मोठी चलती दिसते आहे. याचे कारण पर्यावरणाच्या नावाखाली शेतकरीविरोधी व्यवस्था आणि नोकरशाही चालू ठेवणे व भरभराट करणे या शहरी भद्र लोकांच्या जिव्हाळ्याच्या कार्यक्रमाकरिता ही मंडळी तत्त्वज्ञानाचा एक डोलारा तयार करताहेत. अर्थशास्त्रात नियोजन निरर्थक ठरले असेल. पण पर्यावरणासाठी नियोजन पाहिजे या लबाडीने ते शेतकरीविरोधी आणि नोकरशाहीस सुकर अशी व्यवस्था बळकट करू पहात आहेत. पन्नास वर्षांपूर्वी समाजवाद, नियोजन, शास्त्रविज्ञान यांच्या जल्लोशात शेतकऱ्याला गाडण्यात आले. आता पर्यावरणाचा नवीन जल्लोश त्याच हेतूने ऊठवण्यात येत आहे.

नेहरूवादाची ही नवीन पिलावळ ऊठते आहे. कदाचित् दुसऱ्याही अशा पिलावळी ऊठतील. या सर्वांचा बंदोबस्त कायमचा करायचा तर 'नीरो'वाद अखेरचा आणि कायमचा गाडला पाहिजे."

■■■

**शेतकरी संघटक**

वर्गणी पाठविण्याचा व पत्रव्यवहाराचा पत्ता
संपादक, शेतकरी संघटक,
अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१)
ता, खेड, जि. पुणे

ऊठ किसाना घे मशाल, अन्यायाला जाळ खुशाल ★ ऊठ किसाना घे मशाल, अन्यायाला जाळ खुशाल

खुशाल

ऊठ किसाना घे मशाल, अन्यायाला जाळ खुशाल ★ ऊठ किसाना घे मशाल, अन्यायाला जाळ खुशाल★ऊठ किसाना

खुशाल ★ऊठ किसाना घे मशाल, अन्यायाला जाळ खुशाल ★ऊठ किसाना घे मशाल, अन्यायाला जाळ

# नेहरूवादाच्या गुलामीचे प्रतीक

इंडिया शासनाने अखेर १९ जून रोजी कॅनडाबरोबर १० लाख टन गव्हाच्या आयातीसंबंधी व्यवहारावर सही करून भारतातील शेतकऱ्यांच्या माथी कुऱ्हाड हाणली आहे. २५ जून रोजी कॅनडाच्या कॅनसास शहरातून KRF या वृत्त संस्थेने प्रसारित केलेल्या बातमीनुसार हा गहू जुलैच्या मध्यापासून भारताकडे यावयास सुरूवात होणार असून त्यात तीन प्रतींचा गहू असणार आहे. त्याचा तपशील असा -

| गव्हाची जात | परिमाण - टन | खरेदीचा दर - डॉलर प्रति टन |
|---|---|---|
| नं. २ कॅनेडियन डुरूम | ५,२५,००० | १४३.५० ते १४७.५० |
| कॅनेडियन वेस्टर्न रेड स्प्रिंग | ४,५०,००० | १४०.०० ते १४४.०० |
| कॅनेडियन वेस्टर्न सॉफ्ट व्हाईट | ३०,००० | १४६ ते १४७.५० |

याचा अर्थ या गव्हाचा खरेदीचा कॅनडातील जाग्यावरचा दर अंदाजे सरासरी ४२० रुपये प्रतिक्विंटल आहे. वाहतुकीचा खर्च लक्षात घेता हा गहू भारतात येईपर्यंत सरासरी ६०० रुपये प्रतिक्विंटलपेक्षाही जास्त भावाचा होणार आहे.

भारतातील शेतकऱ्यांना त्यांच्या गव्हासाठी बोनस वगैरे सर्व मिळून प्रति क्विंटल २७५ रुपयांपेक्षा अधिक किंमत देण्यास तयार नसलेले शासन परदेशातून मात्र इतक्या भरमसाठ किंमतीने, तेही देश परकीय चलनाच्या संकटात असतांना, आयात करून आपला नेहरूनीतीप्रणित शेतकरीद्वेषच उघड करीत आहे.

इतके करूनही शासन थांबणार नाही असेही स्पष्ट झाले आहे. इकॉनामिक टाईम्स् च्या दिल्लीतील प्रतिनिधीने कॅनडातून आलेल्या वरील बातमीची शहानिशा करण्याकरिता अन्न मंत्रालयात चौकशी केली असता तेथील अधिकाऱ्यांनी या बातमीला दुजोरा तर दिला त्याशिवाय, आणखी गहू कॅनडा, युरोप किंवा अमेरिकेतून आयात केला जाण्याची शक्यताही त्यांनी नाकारली नाही. शासनाने अशी आयात करण्याचे ठरवले तर गव्हाच्या वाढत्या मागणीच्या बातमीने गव्हाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमती चढतील अशी शक्यता आहे. तसे होऊ नये यासाठी शासन अशा आयातीच्या व्यवहारावरील सही 'गुपचूप' पणे करील असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

गव्हाची देशातील वाढीव मागणी, यंदाच्या मान्सून स्थितीत उत्पादनाची अनिश्चितता अशी कारणे या आयातीसंबंधी हे अधिकारी जरी देत असले तरी भारतीय किसान यूनियनने गव्हाच्या वाढीव किंमतीसाठी जे आंदोलन चालविले आहे त्याचा परिणाम म्हणून यावर्षी जून महिन्यापर्यंत खरेदीयंत्रणेला फक्त ६३ लाख ५० हजार टनच गहू खरेदी करता आला, गेल्या वर्षी जूनपर्यंत ही खरेदी ७७ लाख टन होती हेही एक आयाती मागील कारण असल्याचे त्यांनी सांगितले.

किसान समन्वय समितीने गव्हाचे ४०० रुपये प्रति क्विंटल दराने टेंडर भरून लागेल तितका गहू पुरविण्याची हमी दिली होती त्याचे काय केले हे मात्र कधीच कळले नाही.

**शेतकरी संघटक ६ जुलै १९९२**

# कापूस एकाधिकार
# नवीन योजनाही शेतकरीविरोधीच असणार

*'कापूस एकाधिकार खरेदी योजने'मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २६ मे १९९२ रोजी एक चर्चा घडवून आणली. त्यावेळी या योजनेसंदर्भातील शेतकरी संघटनेची भूमिका मांडणारा श्री. शरद जोशी यांचा लेख शेतकरी संघटकच्या ६ जून १९९२ च्या अंकात प्रकाशित करण्यात आला आहे.*

*वरील चर्चेच्या अनुषंगाने अधिक विचारासाठी व शिफारशींसाठी महाराष्ट्र शासनाने एक समिती गठित केली व तिच्या बैठकाही सुरू झाल्या. श्री. शरद जोशी यांचीही या समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. या नियुक्तीस नकार देणारे हे पत्र श्री. शरद जोशींनी या समितीच्या अध्यक्षांना पाठविले आहे.*

१ जुलै १९९२

प्रती,
मा. मंत्री (सहकार)
अध्यक्ष, कापूस एकाधिकार खरेदी योजना समिती,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०० ०३२

**विषय : कापूस एकाधिकार खरेदी योजना समिती**

संदर्भ : पत्र क्र. सी. एम्. एस्/ कापूस/१०९२/८७/६४/१० - सो दि. ११ जून १९९२

महोदय,

दि. ११ जून १९९२ च्या पत्रकाद्वारे महाराष्ट्र कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या पुढील स्वरूपाविषयी शिफारशी करण्याकरिता एका समितीची नियुक्ती केल्याचे कळविण्यात आले आहे. या समितीत सदस्य म्हणून मी किंवा माझे एक प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्यात आली याबद्दल मी आपला आभारी आहे.

या विषयावर मला जे काही म्हणावयाचे होते ते थोडक्यात, २६ मे ९२ च्या बैठकीत मी मांडले होते व त्यासंबंधी एक टिपणही तयार करून पाठविले आहे. या टिपणाची एक प्रत संदर्भासाठी सोबत जोडली आहे. (शेतकरी संघटक ६ जून १९९२)

या पलिकडे जाऊन या समितीबरोबर काम करण्याची माझी इच्छा नाही.

१. समितीच्या नियुक्तीपूर्वी संबंधितांशी विचारविनिमय करण्याचा शिष्ठाचार आहे. माझ्याकडे विचारणा केली असती तर शेतकरी संघटनेचा दृष्टीकोन पुढे मांडण्यासाठी योग्य अशा तज्ज्ञ सहकाऱ्याचे नाव दिले असते. मला विचारले असते किंवा नसते तरी माझ्या कामाच्या व्यापात ही जबाबदारी मी स्वीकारू शकलो नसतो. माझ्या कोणत्याही सहकाऱ्यास केवळ माझा प्रतिनिधी म्हणून दुय्यम सदस्यत्व स्वीकारण्याची विनंती मी करू शकणार नाही.

२. समितीतील बहुसंख्य सदस्य हे योजनेच्या गैरकारभाराशी संबंधित किंवा त्याकरिता जबाबदार असलेले आहेत. त्यांच्याच सल्लामसलतीने नवीन चांगली व्यवस्था उभारणे अशक्य आहे. जुन्या व्यवस्थेतील गोंधळाबाबत ज्यांची चौकशी व्हायला हवी त्यांना नवीन व्यवस्थेचे जनकत्व देणे मला अयोग्य वाटते.

३. समितीतील सदस्यांची संख्या फार मोठी आहे. ही समिती कार्यक्षमपणे काम करू शकणार नाही. अहवाल लिहिणारे अधिकारीच शिफारशींच्या स्वरूपावर प्रभाव पाडणार आहेत हे उघड आहे.

४. समितीनियुक्तीची ही पद्धत लक्षात घेता हाटे समितीनंतर अशा तऱ्हेची समिती काही उपयोगाची आहे, असे मला वाटत नाही.

५. या समितीच्या शिफारशी नोकरशहा आणि सहकार महर्षी यांच्याच सोयीच्या असणार, शेतकरीहितविरोधी असणार हे मला उघड दिसते आहे. नवीन योजनेविरूद्ध शेतकऱ्यांना उभे करण्याच्या कामास आम्ही लागलो आहोत. नवीन आंदोलनाच्या वेळी या समितीचा सदस्य म्हणून नाममात्रसुद्धा राहिल्याचा डाग मला नको आहे.

वर सांगितलेल्या कारणांकरिता मी सदस्यत्व स्वीकारू शकत नाही. आणि शेवटी एक किरकोळ गोष्ट - सदस्यांच्या यादीतील क्रमवारी ठरवितांना, मी काही काळ का होईना, केंद्रीय शासनाच्या कॅबिनेट मंत्र्याच्या दर्जाच्या पदावर काम केले आहे याचा आपल्या सचिवालयास विसर पडलेला दिसतो.

कळावे.

आपला,
**शरद जोशी**

# ही हिम्मत बोफोर्स प्रकरणी का नाही?

नुकतेच दिल्लीमध्ये गाजविलेल्या एका पत्रकार परिषदेत पंतप्रधानांनी घोषणा केली की शेअर मार्केटमधील रोखे गैरव्यवहार प्रकरणातील सर्व जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल; एखाद्या मंत्र्याचा त्यात हात असल्याची माहिती मिळाली तर त्या मंत्र्याचीही गय केली जाणार नाही.

पण बोफोर्स प्रकरणी माधवसिंह सोळंकींनी कोण्या एका वकिलाच्या हाती एक पत्र दिले. त्या वकिलाचे नाव किंवा अन्य माहिती मात्र अजून मिळाली नाही. रोखे गैरव्यवहार प्रकरणी जाहीर केलेली हिम्मत माधवसिंह सोळंकींच्या बाबतीत वापरून त्यांना गजाआड केले असते तर ती व्यक्ती आणि एकूणच प्रकरणातील धागेदोरे मिळविणे सहज शक्य झाले असते.

माधवसिंह सोळंकींचा बोलविता धनी स्वित्झर्लंडमधला नसून खुद्द दिल्लीत जनपथावर राहाणारा असल्यामुळे पंतप्रधानांची त्यांच्या विरूद्ध जाण्याची हिम्मत नाही, हे खरे काय?

# लक्ष्मीमुक्ती आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्या

## (उत्तरार्ध)

गेल ऑमवेट, कासेगाव (सांगली)

***मागील अंकात, गेल ऑमवेट व चेतना गाला फेब्रुवारी ९२ मध्ये केलेल्या 'लक्ष्मीमुक्ती अभ्यास दौऱ्याची पार्श्वभूमी विशद करणारा भाग प्रकाशित करण्यात आला होता. दौऱ्याचा प्रत्यक्ष अनुभव सांगणारा हा लेखाचा उत्तरार्ध.***

तसं चेतना व मी सुरूवातीला या लक्ष्मीमुक्ती अभ्यासदौऱ्याची सूचना मांडली तेव्हा तो मर्यादित, जास्तीत जास्त दहाबारा जणींचा होईल अशी कल्पना होती. पण दोन तीन वेळा शेतकरी संघटनेच्या इतर कार्यक्रमांमुळे तो पुढे पुढे ढकलला गेला. दरम्यान्, ''आम्ही पण या दौऱ्यात येऊ का?'' अशी चौकशी करणारी पत्रे देशातल्या वेगवेगळ्या स्त्री संघटनांच्या कार्यकर्त्यांची येत राहिली. शेवटी शेतकरी महिला आघाडीच्या बैठकीत विचारविनिमय करून संख्येवर काही मर्यादा ठेवायची नाही, सगळ्यांना येऊ द्यायचे नाही, जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाच दिवसांचा व्यापक दौरा करायचा असे ठरले. पण, जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर झाल्याने हा दौराही करणे अशक्य झाले. पण याचवेळी पुण्यात असलेल्या अमेरिकन राज्यशास्त्र प्राध्यापिका डॉ. आयरीन डायमंड व त्यांचे पती 'ग्रीन पार्टी' चे कार्यकर्ते जेफ लँड हे शेतकरी महिला आघाडी व संघटनेचे सहानुभूतीदार अमेरिकेस परत जाणार होते. ते महाराष्ट्राचा ग्रामीण भाग व विशेषतः शेतकरी महिला आघाडीचे काम पाहाण्यास अत्यंत उत्सुक होते. म्हणून यवतमाळ जिल्ह्यातील मेटीखेडा व सीतामंदिरासाठी प्रसिद्ध असलेले रावेरी या दोन गावांचा छोटा दौरा आयोजित केला. त्याच वेळी आणखी काही पाहाता आले तर पाहावे असेही ठरले.

शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते निवडणूक प्रचाराच्या कार्यक्रमात गुंतले होते. त्यामुळे वर्ध्याचे 'ग्रामोपयोगी विज्ञान' या संस्थेचे डॉ. तारक काटे यांच्या मदतीने २ ते ५ फेब्रुवारी या दिवसांत हा दौरा केला.

देशाच्या कानाकोपऱ्यातून अनेक अडचणींना तोंड देत, काही जणी ट्रेन चुकल्यामुळे एसटीने आल्या, काही वर्ध्याला येऊन तेथून व्हॅनने मेटीखेड्याला पोहोचल्या. अमेरिकेतील आयरिन, जेफ, त्यांची मुलगी मार्था तसेच भोपाळमध्ये वायूगळतीच्या दुष्परिणामांचे बळी ठरलेल्यांबरोबर काम करणाऱ्या किम हे आपले परदेशी पाहुणे होते. केरळमधील मासेमारी संघटनेच्या सचीव मर्सी अलेक्झांडर, व आलेयम्मा त्रिवेंदमहून तीन दिवसाचा समुद्रकाठचा प्रवास करून मुंबईमार्गे आल्या होत्या. हिमालयामधील जंगले वाचविण्यासाठी झालेल्या 'चिपको' आंदोलनात बहुसंख्य सहभाग महिलांचाच होता. या आंदोलनाशी संबंधित पर्यावरणवादी लेखिका व संशोधक डॉ. वंदना शिवा तसेच पुण्याच्या 'स्त्री माहिती केंद्रा'च्या मेधा व सम्रिता, वर्ध्याच्या चित्रा काटे व मी असा संच मेटीखेड्याला जमला.

पाहुण्यांची संख्या, चाळीस पन्नासऐवजी दहाबारा अशी मर्यादित राहिल्यामुळे दौऱ्याचे नियोजन सोपे झाले. मेटीखेडा व रावेरी ही दोनच गावे बघीतली तरी लक्ष्मीमुक्ती व सीताशेती कार्यक्रमाची व्यवस्थित कल्पना आली. मेटीखेड्याच्या गावकऱ्यांशी चांगली चर्चा झाली. शाळेत 'स्त्रीमुक्ती आणि अमेरिकेची सामाजिक रूढी' यावर मुलामुलींनी खूप प्रश्नोत्तरे झाली.

रावेरीला 'सीता मंदिर' व 'पडलेल्या हनुमाना'ची मूर्ती पाहिली. सीतेची मुले कुश आणि लव यांनी लढाई करून हनुमानाला येथे पाडले अशी कथा सांगतात. ती ऐकून 'रामा'च्या दादागिरीच्या विरोधात स्त्रिया, दलित व शेतकरी यांच्या लढाईच्या इतिहासाचे ते प्रतिक असावे असे वाटले.

रावेरी गावात स्त्रियांच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेतकरी संघटनेची भूमिका व इतर संघटनांची भूमिका यांवर बरीच उपयुक्त चर्चा झाली.

अजूनही बिहार, पंजाब, आंध्र प्रदेश, तामीळनाडू इत्यादी राज्यांत काम करणाऱ्या स्त्रीकार्यकर्त्या तसेच काही दलित प्राध्यापक, मुंबईचे पत्रकार महाराष्ट्रात चालू असलेला 'लक्ष्मीमुक्ती' चा अविष्कार पाहाण्यास उत्सुक आहेत. त्यांना घेऊन एखादा मोठा, व्यापक दौरा आयोजित करता आला तर ते देशभरच्या स्त्रीचळवळीला योग्य दिशा मिळण्याच्या दृष्टीने उपयुक्त होईल; निदान व्यापक समन्वय तरी सुरू होईल.

---

### शेतकरी संघटक आजीव वर्गणीदार
### (२१ जून ते ४ जुलै १९९२)

१७६. चेअरमन / सेक्रेटरी
श्री हिंदुस्थान सह. दुध व्याव. सं. म.
मजले, जि. कोल्हापूर

१७७. चेअरमन / सेक्रेटरी
ग्रामसेवक वि. का. स. (विकास) सेवा सं. म.
हालोंडी, जि. कोल्हापूर

१७८. चेअरमन / सेक्रेटरी
श्री गोपालकृष्ण दुध उत्प. सह. सं. मर्या.
वडगाव, जि. कोल्हापूर

१७९. अध्यक्ष, सांस्कृतिक मंडळ
भाऊसाहेब हिरे नगर, दाभाडी, जि. नाशिक

१८०. कार्यकारी संचालक
दि गिरणा सह. सा. कारखाना लि.
भाऊसाहेब हिरे नगर, दाभाडी, जि. नाशिक

१८१. श्री. ए. व्ही. महालुनकर
४, द्वारिका अपार्टमेंट,
अजिंक्यतारा हौसिंग सोसायटी, जि. सातारा

१८२. प्रताप इंजिनिअरिंग वर्क्स
नाना पेठ, विठ्ठल मंदिराशेजारी, जि. पुणे

१८३. चेअरमन, मिरज तालुका पश्चिम विभाग सह. ख. वि. संघ लि. सांगली, वसंत मार्केट यार्ड, जि. सांगली

१८४. चेअरमन, कुपवाड वि. का. स. (विकास) सेवा संस्था म. कुपवाड, जि. सांगली.

१८५. श्री. रामनाथ तुकाराम दरेकर
मु. पो. विंचूर, जि. नाशिक

# नेहरूंचे आर्थिकच काय, राजकीय धोरणही अपयशी

मा. शरदरावजी जोशी यांसी
सप्रेम नमस्कार वि. वि.

शेतकरी संघटक दि. २१ जून चे पाक्षिकांतील, नेहरूंचे अर्थिक धोरणाबाबतचा आपला लेख वाचला. लेखातील आशय व विचार स्पष्ट आहेत. त्यामध्ये राजकीय पुढारी बोलतात तशी गुळमुळीत व गोलमाल भाषा नाही. असा लेख वाचावयास मिळाला म्हणून मी आपले अभिनंदन करतो. हा लेख दैनिकांत प्रसिद्ध केल्यास अधिक वाचकांचे त्यामुळे प्रबोधन होईल असे सुचवतो.

लेखामध्ये आपण आर्थिक धोरण फसल्याबाबतचा मुद्दा प्रामुख्याने मांडला आहे. परंतु राजकीय धोरण फारसे यशस्वी झाले आहे असे नाही. पंडीत नेहरूंनी स्वातंत्र्यानंतर सतत १९६४ पर्यंत म्हणजेच त्यांचे देहावसान होईपर्यंत भारताचे पंतप्रधानपद कायम स्वतःकडे राखले. त्या पदाच्या जवळपासही कोणास फिरकू दिले नाही.

काश्मिरचा प्रश्न कारण नसताना यु. नो. मध्ये नेला. ३७० कलम भारताचे मानगुटीवर ठेवले. व आता भारताची गुदमरून जाण्याची वेळ आली आहे. व त्यामुळे काश्मिर संरक्षणाचा प्रश्न जटिल बनला असून त्याचा आर्थिक बोजा भारतीयांना सोसावा लागत आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वातंत्र्य मिळाल्यावर लगेचच भारताच्या सीमा सुरक्षित ठेवा असा सल्ला दिला होता. त्याकडे लक्ष दिले नाही. हिन्दी, चिनी भाई भाई व पंचशीलच्या घोषणा कागदावरच राहिल्या व चिन्यांनी तिबेट गिळंकृत केला. पाकिस्तानबाबत कधीही खंबीर भूमिका घेतली नाही. याबाबत आचार्य, अत्र्यांनी नवयुगामध्ये लेखन केले त्याचे शीर्षक होते 'नेहमी हरू ते नेहरू.'

समाजवादी समाज रचना ही नुसती घोषणाच ठरली, त्यादृष्टीने कारभार झाला नाही. पोस्ट ऑफीसमधील नोकरवर्गाने किमान ५ ते १५ रुपयाच्या वाढीची मागणी केली व संप केला. परंतु पं. नेहरूंनी ही मागणी मान्य केली नाही. पं. गोविंद वल्लभ पंत गृहमंत्री होते, त्यांचे सल्ल्याने संप मोडून काढला.

पंडीत नेहरू जे एकदा सिंहासनावर बसले ते अखेरपर्यंत त्याना म. गांधीचा आशिर्वाद व त्यांचेविना भारताचे नेतृत्व कोणास करताच येणार नाही असा सर्वांचा चुकीचा गैरसमज करून देण्यांत आला. नेहरूंच्या गोंडस व्यक्तिमत्वाला त्यावेळचे लोक भुलले व त्यांना कोणहीही जाब विचारला नाही.

म. गांधी व पं. नेहरू यांचे आहारी त्यावेळची प्रजा कशी गेली हे एक महान् आश्चर्य आहे. त्या पुढाऱ्यानी आखलेली धोरणे व केलेला कारभार याचा आढावा या लहानशा पत्रांत घेणेचा नाही व तसा हेतूही नाही. मोठ्या पुढाऱ्यांनी केलेल्या चुकांचे दुष्परिणाम भारतीयांना भोगावे लागत आहेत हे मात्र सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे.

आपला,
**गो. ह. आगाशे**
३५ ब सुभाषनगर,
पुणे १६

२६/६/१९९२

# सत्तामत्त फुडारी

आणिबाणीच्या काळात काँग्रेसवाल्यांची माथी खूपच फिरली होती. आता आपली सत्ता 'यावद्चंद्रदिवाकरौ' चालणार आहे एवढेच नव्हे तर आता आपल्या सत्तेला काही मर्यादा नाही, धरबंध नाही अशा मस्तीत काँग्रेसवाले वागत होते.

१९७७ सालच्या निवडणुकीत स्वतः शरद पवार गुर्मीत बोलले होते की सर्व तुरूंगांची सध्या रंगसफेती चालू आणि निवडणुका झाल्यानंतर सर्व विरोधक पुन्हा एकदा तुरूंगातच जाऊन बसणार आहेत.

अशा सत्तामत्तांना ७७ सालच्या निवडणुकीने एक धडा शिकविला. पण त्या धड्याचा विसर फार लवकर पडला. ७७ साली जनता पक्ष आणि ८९ साली राष्ट्रीय मोर्चा यांच्या दळभद्री कामगिरीमुळे पुन्हा एकदा काँग्रेसवाल्यांना निरंकुश सत्ता आपल्या हाती आली आहे असा माज चढतो आहे. महाराष्ट्रात तर विरोधक म्हणून कोणी राहिलेलाच नाही. शरद पवार दिल्लीला पोहोचले. पंतप्रधानपदाच्या खुर्चीच्या पायापर्यंत त्यांचे हात पोहोचलेलेच आहेत. आता गावगन्ना दूध सोसायट्यांपासून, साखर कारखान्यांपासून ते जिल्हा परिषदा, विधानसभा, लोकसभा इथपर्यंत आपलीच सत्ता असल्याच्या गुर्मीत महाराष्ट्रातील काँग्रेसवाले वागू लागले आहेत. त्यांच्या वागण्याचा ताल सुटला आहे.

फलटण तालुक्यातील दूध संघाचे अध्यक्ष आणि पवारांचे कट्टर समर्थक म्हणविणारे सुभाष शिंदे नावाचे कुणीएक फुडारी हे अशा नेत्यांपैकी एक. दि. ३० जून रोजी फलटण येथील गजानन चौकात एक जाहीर सभा भरली होती. देवघर धरण, फलटण-लोणंद ब्रॉडगेज रेल्वे हे प्रश्न मार्गी लावल्याबद्दल, सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीतील यशाबद्दल, फलटण येथील औद्योगिक वसाहतीला मंजुरी मिळविल्याबद्दल संबंधितांचा सत्कार करण्यासाठी ही सभा होती.

जयजयकार आणि सत्कार करायला काहीच हरकत नाही पण सुभाष शिंदे यांनी भाषणात जी भाषा वापरली त्याबद्दल सावध होणे आवश्यक आहे.

''संरक्षण मंत्री शरद पवारांच्याविरूद्ध सातारा जिल्ह्यातील काही लोकप्रतिनिधी वेड्यावाकड्या पद्धतीने अपशब्द वापरत आहेत. हे उद्योग थांबले नाहीत तर रस्त्यातच काय, पण घरातून बाहेर ओढून संबंधितांचा बंदोबस्त करू.'' असली भाषा या फुडाऱ्यांनी वापरली.

अशी मस्ती दिसू लागली म्हणजे शेवट जवळ आला हा धडा इतिहासाने रावणापासून नोंदला आहे. असल्या भाषणांना महत्त्व देण्याचे कारण नाही. येत्या महिन्याभरात शरद पवारांची उचलबांगडी झाली तर त्यांच्या आसपास राहून दात काढून गुरगुरणारी ही मंडळी शरद पवारांवरच भुंकायला सुरूवात करण्यास चोवीस तासांचीही दिरंगाई करणार नाहीत हे उघड आहे.

# ‘भारता’साठी परमिट राज्यच!

मुक्त अर्थव्यवस्थेचे नगारे वाजवीत असतांनाच इंडिया सरकारने ९ जून १९९२ रोजी जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्याखाली एक ‘दूध व दुग्धजन्य पदार्थांबाबात आदेश’ जारी करून दूध व दुग्धजन्य पदार्थांचे देशभरातील उत्पादन, खरेदीविक्री, पुरवठा व वितरण नियंत्रित करणार असल्याचे घोषित केले आहे. यासाठी पशुपालन खात्याच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक सल्लागार मंडळ स्थापन करण्यात येणार असून त्यात उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, स्वास्थ व कुटुंबकल्याण ही मंत्रालये, राष्ट्रीय दुग्धव्यवसाय संशोधन संस्था, राष्ट्रीय दुग्धव्यवसाय विकास मंडळ आणि सहकारी दूध सोसायट्यांचे राष्ट्रीय महामंडळ यांच्या प्रतिनिधींचा समावेश असणार आहे. दर दिवशी १० हजार लिटर दूध किंवा दर वर्षाला ५०० टनांपेक्षा अधिक घनदुग्धांश असलेल्या दुग्धजन्य पदार्थांची उलाढाल करणाऱ्यांना आता अधिकृत नोंदणी करून घेणे या आदेशाप्रमाणे बंधनकारक ठरणार आहे.

व्यवसायासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनसामुग्रीत बदल सुचविणे, सुधारणा सुचविणे तसेच संबंधिताने करावयाच्या उत्पादनावर कमाल मर्यादा घालणे यांसारखे अधिकार संबंधित नोंदणी अधिकाऱ्यास असणार आहेत.

इकॉनामिक टाईम्स्‌च्या दि. १२ जून १९९२ च्या अग्रलेखात म्हटले आहे – ”गेल्या वर्षी बंधनमुक्त केलेल्या दूधव्यवसायावर पुन्हा बंधने लादून शासनाने मुक्त अर्थव्यवस्थेपासून घूमजाव केले आहे. शहरी मध्यवर्गीयांच्या हितसंबंधांपोटी दूधउत्पादकांच्या हिताचा बळी देण्याचाच हा प्रकार आहे. कित्येक दूध उत्पादक शेतकरी हे शहरी ग्राहकांपेक्षा गरीब असतांनाही शहरवासियांच्या सोयीसवलतीसाठी त्यांच्यावर जाणूनबुजून बोजा टाकला जात आहे. यात काही आर्थिक शहाणपण नाही आणि सामाजिक न्यायही नाही. दूध हे जरी उच्च प्रतीचे अन्न असले तरी दारिद्र्यरेषेखालील लोक दुधाचे ग्राहक नाहीत हे अनेक अभ्यासांनी सिद्ध झाले आहे. पण शहरी मध्यम वर्गाचा राजकीय दबाव मोठा असतो आणि राजकारण्यांना त्यापुढे नेहमी झुकावे लागले आहे. आणि म्हणून शासनाला या साध्या प्रश्नातसुद्धा माघार घ्यावी लागली. मुक्त अर्थव्यवस्थेच्या भवितव्याच्या दृष्टीने या घटनेने पुढे ठेवलेले उदाहरण काही चांगले नाही.“

इकॉनामिक टाईम्स्‌च्या मुंबईच्या विशेष प्रतिनिधीने दिनांक १६ जूनच्या अंकामध्ये लायसेन्स-परमिट राज्य मागील दाराने पुन्हा सुरू होत आहे असे म्हणून ”सरकारचा मुक्त अर्थव्यवस्थेबरोबरचा मधुचंद्र संपुष्टात आला आहे का?“ असा प्रश्न विचारला आहे.

खरे पाहाता, आता असे दिसू लागले आहे की मधुचंद्र तर सोडाच पण इंडिया शासनाने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्याचा गंभीरपणे विचार केलाच नव्हता, फक्त कर्जसमस्येमुळे घायकुतीला आल्याने काही काळ ‘आँखमिचौली’ करीत फक्त चवचालपणा केला. त्यातून, अकार्यक्षम म्हणून सिद्ध झालेल्या उद्योगक्षेत्राच्या पदरात जितके लाभ घालता आले तितके घातले आणि प्रत्यक्षात मात्र शेतीची लूट करणाऱ्या ‘मृत नेहरूनीती’लाच कवटाळून इंडिया शासन बसले आहे एवढेच नव्हे तर त्या नीतीचा अंमल अधिक कठोरपणे करीत आहे.

# चिखलप्रुफ भ्रष्ट घराणे

‘इझवेस्तिया’, या मॉस्कोतील सायंदैनिकाने ‘रशियातील गुप्तहेर संस्था KGB तर्फे राजीव गांधी यांना कोट्यवधी रुपये देण्यात आले होते’ अशी बातमी छापली आहे. या रकमा रशियाशी व्यापार करणाऱ्या, नेहरू घराण्याशी संबंधित एका कंपनीमार्फत पोहोचविण्यात येत होत्या आणि त्या मिळाल्याबद्दल राजीव गांधी यांनी आभारदर्शक पत्र लिहिल्याचेही या दैनिकात प्रसिद्ध झाले आहे.

ही बातमी प्रसिद्ध होताच काँग्रेस पक्षातर्फे साहजिकच या बातमीचा इन्कार करण्यात आला आणि तिसऱ्या जागातील नव्या नेतृत्वाला बदनाम करण्याचा डाव मॉस्कोत शिजत आहे अशी वर मखलाशी करण्यात आली.

तिसऱ्या जगातील नेत्यांवर चिखलफेक करण्यात मॉस्कोत आज जे कोणी सत्ताधारी असतील त्यांना काय स्वारस्य आहे हे काही काँग्रेसच्या प्रवक्त्याने स्पष्ट केले नाही. असा प्रश्न कुणी विचारूही नये. रॉकेट क्षेपणास्त्रांचे तंत्रज्ञान भारताला पुरविण्याबाबत रशियातील नव्या सत्ताधाऱ्यांनी अमेरिकेचा रोष पत्करूनसुद्धा भारताला पाठिंबा दिला त्यांना राजीव गांधींवर आता चिखलफेक करण्याची काय आवश्यकता आहे?

असल्या आरोपांचा केला जाणारा इन्कारही आता हास्यास्पद झाला आहे. दिल्लीतील कोणीच सत्ताधारी कोणी निःस्वार्थ महात्मा नाही हे सगळ्या जगाला माहीत आहे. आणि राजीव गांधींवर दोन शिंतोडे उडाले तर त्याची चिंता करण्याचे काय कारण? नेहरू घराण्यातील कोणाही माणसावर अफवांचा सोडाच, पण सज्जड पुराव्याने शाबित झालेल्या आरोपांचासुद्धा काहीही परिणाम होत नाही. त्याबद्दल उगाच चिंता कशाला ?

पंडित नेहरूंनी व्यक्तिगत भावनेपोटी माऊंटबॅटन यांची फाळणीयोजना स्वीकारली असे आज उघड दिसते आहे. ऐतिहासिक सत्ये जितकी सिद्ध होऊ शकतात त्या प्रमाणात हेही सिद्ध झाले तरी नेहरूंचा जयघोष काही थांबणार नाही. नेहरूंच्या औद्योगिकरणाच्या धोरणाने देश दिवाळखोर झाला हे आज काँग्रेसवालेही कबूल करतात पण त्यामुळे पंडित नेहरूंभोवती ओवाळायच्या आरत्या कोठे कमी पडलेल्या नाहीत. आणिबाणीत सर्व प्रकारचे अत्याचार करूनही इंदिरा गांधी देशमाता बनल्या आहेत. सगळ्या राजकीय आयुष्यात निखळ निष्कलंक असलेला मनुष्य दुर्मिळ झाला आहे. अशा परिस्थितीत राजीव गांधी हे अगदी परकीय सत्तेचे हस्तक होते असे सिद्ध झाले तरी नेहरू-गांधी घराण्याच्या उदोउदोत काही कमतरता होणार नाही.

जोपर्यंत इतक्या भ्रष्ट घराणेशाहीला विरोधक पर्याय देऊ शकत नाहीत तोपर्यंत हे नेहरूवादाचे भूत जनसामान्यांच्या छातीवर नाचणारच आहे.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 7th July, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
July 6, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment **No. 87**

# शेतकऱ्यांनी यंदा स्वतःपुरते पिकवावे

भीज पावसाची हुलकावणी दाखवून पाऊस सध्यातरी लपून बसला आहे. यंदा लागोपाठ दुसऱ्या वर्षी दुष्काळी परिस्थिती येईल ही शक्यता जास्तीत जास्त स्पष्ट होऊ लागली आहे. अनेक ठिकाणी पेरणी केलेली बियाणीही वाया जातील आणि नव्या पेरण्या कराव्या लागतील असे दिसते आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी यंदा धान्याची पिके घेण्याचा मोह टाळला पाहिजे. नवीन बियाणे घ्यायचे झाले तर कमी खर्चात भागावे म्हणून ज्वारी बाजरीची पेरणी करण्याकडे कल होईल.

गव्हाची आयात करून शासनाने शेतकऱ्यांना धडा शिकविलाच आहे. पुढच्या वर्षी पुन्हा लेव्हीचीसुद्धा सुरुवात होण्याची शक्यता आहे. नेहरूवादाचा थयथयाट दुष्काळी वातावरणात तर कोणत्याही धरबंधाशिवाय चालू होईल.

शेतकरी संघटनेच्या परभणी अधिवेशनातील ठरावात म्हटल्याप्रमाणे शेतकऱ्यांनी धान्याची पिके फक्त घरच्या खाण्यापुरती, शेतावरील कामगारांच्या खाण्यापुरती आणि गावाच्या गरजेपुरती पिकवावीत. बाजारात विकण्याकरिता म्हणून ज्वारी, बाजरी, भात, गहू पिकविण्याचा हट्ट धरू नये. त्यात त्यांचे अहित आहे. तेलबिया, डाळी, भाजीपाला, नगदी पिके इत्यादि बाजाराकरिता तयार करण्यास अडचण नाही.

पाण्याचे आणि इतर साधनांचे दुर्भिक्ष लक्षात घेऊनही हा कार्यक्रम राबविणे हिताचे होईल. नाहीतर लागोपाठ दुसऱ्यावर्षी दुष्काळ आणि त्यात तेरावा महिना असे भवितव्य दिसते आहे.

## शेतकऱ्यांनी स्वतःच मार्ग शोधला

### दलालांपासून मुक्ती मिळविलेला रात्रीचा बाजार

पुणे, ता. २९ : कृषी उत्पन्न बाजार समितीचे निर्बंध व दलालांचा हस्तक्षेप नसल्यामुळे, उरुळीकांचन (ता. हवेली) येथे रात्री भरणाऱ्या बाजाराला ग्राहक आणि विक्रेते या दोघांचाही प्रतिसाद वाढत चालला आहे.

या बाजाराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे तेथे थेट व्यापारी आणि शेतकरी यांच्यातच व्यवहार होतो. मालाची किरकोळ विक्रीची किंमत वाढण्यास कारणीभूत ठरणारा 'दलाल' हा घटक कटाक्षाने दूर ठेवण्यात आला आहे. त्या ठिकाणी असे मध्यस्थ नसल्याने भावाच्या संदर्भातील फसवणुकीचे संभाव्य प्रकारही टळतात. त्यामुळे उरुळीकांचन भागातील असंख्य लहान शेतकरी आपला माल पुणे वा अन्य गावांतील बाजारपेठांत पाठवण्यापेक्षा स्वतः रात्रीच्या बाजारात विकणे पसंत करतात.

साधारणपणे रात्री अकरानंतर विविध भागांतील शेतकरी शेतमालासह बाजार मैदानावर दाखल होऊ लागतात. पाटस, जेजुरी, वाघापूर, पारगाव, कोरेगाव, खामगाव, नायगाव, कुंजीरवाडी आदींसह सुमारे चाळीस-पन्नास गावांतील हे शेतकरी सायकल, जीप, ट्रॅक्टर, टेंपो, बैलगाडी या वाहनांतून माल आणतात. आटोक्यातील अंतर असल्यास डोक्यावरूनही पाटीतून त्याची ने-आण केली जाते.

इतर घाऊक बाजरांत सामान्यतः पहाटे चारच्या सुमारास खरेदी- विक्री सुरू होते. येथे मात्र रात्री दीड-दोन वाजता उलाढालीस प्रारंभ होतो व व्यापारी आणि शेतकरी साडेचारपर्यंत तेथील आपापल्या व्यापातून मोकळे होऊन परतीच्या प्रवासाला निघालेले असतात.

या बाजाराचा फायदा प्रामुख्याने लहान शेतकऱ्यांना अधिक होत आहे. एखाद्याकडे रोज तीन-चार पाट्याच माल निघत असेल, तर त्याच्या मूळ गावाात वाजवी भाव मिळत नाही आणि पुण्यासारख्या मोठ्या बाजारपेठेत तो पाठवायचा म्हटल्यास वाहतूक खर्च परवडत नाही, अशा शेतकऱ्यांची कोंडी होते. त्यामुळे त्याला हा जवळचा बाजार सोईस्कर वाटतो. दलाल नसल्यामुळे ग्राहकाकडून रोख पैसे लगेच मिळतात व जाण्या-येण्यातही फार वेळ खर्ची पडत नाही. उरुळीकांचनला बाजार समिती नाही. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या करांचा भुर्दंडही टळतो. सध्या फक्त ग्रामपंचायतीकडून किरकोळ स्वरूपाची करआकरणी होते. या पोषक परिस्थितीचा परिणाम म्हणून या बाजाराची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

सकाळ दि. ३०/६/९२ वरून

राजकीय पुढारी आणि त्यांच्या हस्तकांच्या दादागिरीखाली चालू असलेल्या बाजारसमित्यांच्या जाळ्यातून ठीकठिकाणच्या शेतकऱ्यांनी अशा तऱ्हेने आपली सुटका करून घेतली तर खऱ्या अर्थाने शेतकरी संघटनेच्या चतुरंग शेतीतील 'व्यापार शेती' चा प्रयोग सुरू झाला असे म्हणता येईल.

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**